# बहुउपयोगी खनीज मिश्रण

**डॉ. चैतन्य पावशे**
पशुजनन, मादीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशु विज्ञान संस्था, अकोला.

जनावराच्या पचन क्रियेसाठी त्याच बरोबर शरीराची वाढ होण्यासाठी, झीज भरुन काढण्यासाठी, रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी, दुध उत्पादनामध्ये वाढ होण्यासाठी तसेच गर्भातील वासराच्या वाढीसाठी जनावरांच्या खाद्यामध्ये मुबलक प्रमाणात खनिज क्षारांची आवश्यकता असते. जनावरांना आहारात फक्त वाळलेला कडबा, हिरवा चारा आणि सरकी पेंड देतो. ह्या खाद्यामध्ये क्षारांचे प्रमाण अत्यल्प असते. यामुळे जनावरांच्या आहारात वरील खाद्यासोबतच क्षार मिश्रण योग्य प्रमाणात पुरवणे गरजेचे आहे.

**क्षारांचे महत्व**

- दूध तयार होण्यासाठी कॅल्शियम आणि फॉस्फरस ह्या दोन क्षाराचा जास्त प्रमाणात उपयोग होतो. त्यामुळे दुभत्या जनावरांच्या रोजच्या आहारात ह्या क्षाराचा समावेश करावा.
- जनावरांची रोग प्रतिकार शक्ती टिकवण्यासाठी झिंक, सेलिनियम व आयोडिन यांची गरज लागते. वरील क्षारांची कमतरता झाल्यास जनावर वारंवार आजारी पडते.
- झिंक, मॅगनीज, सेलोनियम व आयोडिन यांसारखे सूक्ष्म क्षार प्रजनन कार्यात देखील महत्वाचे कार्य करतात.
- सूक्ष्म क्षार आहारात योग्य प्रमाणात असतील तर गायीचा जार लवकर पडतो व गाय वेळेवर माजावर येते. जनावरांचे गाभण राहण्याचे प्रमाण वाढते. तसेच गाभण अवस्थेत गर्भाची वाढ देखील योग्य प्रमाणात चांगली होते, यामुळे जन्मणारी वासरे सदृढ व निरोगी राहतात.
- क्षार मिश्रणामुळे खाद्याची पाचकता सुधारते. तसेच रवंथ करण्याचे प्रमाण योग्य राहते व जनावर निरोगी राहतात.
- गाभण गायीमध्ये जर आपण हे क्षार मिश्रण योग्य प्रमाणात दिले तर प्रजननानंतर होणारा दुग्धज्वर हा आजार टाळला जाऊ शकतो. त्यामुळे होणारा औषधीवरील खर्च टळतो व दुधाचे प्रमाण ही टिकून राहते.

म्हणून प्रत्येक दुभत्या गाईला दररोज (१०० किलो वजनास २० ग्रॅम याप्रमाणात) १०० ग्रॅम खनिज मिश्रण किंवा क्षार मिश्रण देणे आवश्यक आहे. लहान वासरांना व सहा महिन्यावरील गाभण गायींना ५० ग्रॅम क्षार मिश्रण खाद्यातून द्यावे.

सध्या बाजारपेठेत ''चिलेटेड'' खणिज मिश्रण उपलब्ध आहे. त्याचा वापर केल्यास दुध उत्पादन व प्रजननास जास्त फायदा होवु शकतो.